# बिइंग वुमन

पुणे । वर्ष ५ । अंक ३ । मार्च २०२४ । पाने २०





सात्विक पदार्थांची मेजवानी देणारी
ती 'अन्नपूर्णा'
#सलाम स्त्री शक्तीला


जीवनातील विविध चित्रांचा मिलाप
सांधणारी ती 'चित्रकर्मी'
#सलाम स्त्री शक्तीला


धाग्याधाग्यातून बंध
विणणारी ती 'विणकर'
#सलाम स्त्री शक्तीला


तू विजयश्री
मातृत्वदायिनी, जीवनदायिनी, रंगकर्मी, अन्नपूर्णा,
गृहकर्तव्यदक्ष, न्यायदायिनी, शस्त्रधारिणी, प्रयत्नवादी


24 तासांची ड्युटी करूनही
न थकणारी ती 'गृहकर्तव्यदायिनी'
#सलाम स्त्री शक्तीला

# बिइंग वुमन

**पुणे । वर्ष ५ । अंक ३**
**मार्च २०२४ । पाने २०**

RNI NO. MAHMAR/2019/78753

मुख्य संपादिका
**रोहिणी वांजपे**
९८२२८६२२५५

उप-संपादिका
**चित्राली कुलकर्णी**
९८५०९५८४३१

कॉरपोरेट कमर्शियलस्
**शुंभांगी नांदूरकर**
८५५२८५७७७९

डिझाईन
**ऑफबीट कॉन्सेप्टस्**
९८८१०९८०१०


**संपर्क कार्यालय**
**'बिइंग वुमन'**
६०३, फिफ्थ, अव्हेन्यू,
सिटीप्राईड थिएटरजवळ, पुणे ४११०३८
editorial@thebeingwoman.com

'बिइंग वुमन' हे पाक्षिक
मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे
यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क
'सी' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड,
पुणे ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११,
संगीता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे ४११००१
येथून प्रसिध्द केले.
**संपादक-रोहिणी अरुण वांजपे**
(प्रसिद्ध केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| • संपादकीय | रोहिणी वांजपे | ४ |
| • गोष्ट लग्नाची | उषा अरुण प्रभुणे | ५ |
| • अष्टपैलू राजकारणी | मेधा कुलकर्णी | ९ |
| • खंबीर 'ती' | मोहन जोशी | १० |
| • स्त्रीमुक्ती म्हणजे नेमके काय? | सौ. श्रिया कुलकर्णी | १२ |
| • तव ठायी | ऐश्वर्या | १४ |
| • कर्तृत्ववान महिला | सौ. दीप्ती मिलिंद कल्याणकर | १५ |
| • आधुनिक भारताच्या विकासात महिलांचे योगदान | टीम बिइंग वुमन | १८ |

# संपादकीय



**रोहिणी वांजपे**
संपादक, 'बिइंग वुमन'
editorial@thebeingwoman.com

नमस्कार बिइंग वूमनच्या वाचकांना या महिन्यात येणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. हा  संपूर्ण महिनाच महिलांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमानी व्यस्त असतो. वेगळे काम केलेल्या महिलांचा सत्कार होतो, वॉर्ड दिली जातात. खरंतर वर्षातला एक महिना सर्व समारंभ आयोजित करतात त्याएवजी माझ्या दृष्टीने असे दिवस साजरे करावेत. महिलांना लागणारी मदत करावी आरोग्य, कायदे, व्यवसाय, फायनान्स, स्व-संरक्षण, मानसिक आरोग्य अशा विविध विषयांवरची व्याख्याने ठेवावीत. वर्षातील एक दिवस नाही तर वर्षभर स्त्रियांचा आदर-सत्कार होणे खूप गरजेचे आहे असे वाटते.

स्त्रियांनी स्वतःची बलस्थाने ओळखून तसे निर्णय घ्यावेत. स्त्री जन्मजात प्रेमळ असते. कुटुंबासाठी, मुलांसाठी ती प्रसंगी अन्याय पण सहन करते. ती कमकुवत नसते. प्रसंग आला तर ती दुर्गा, चंडी होते. ती अबला नाहीच तर ती सबला आहे. दुसऱ्या स्त्रियांना मदत करतेच. आता स्त्री नोकरी, व्यवसायासाठी बाहेर पडली आहे. पण घराकडे तिचं दुर्लक्ष होत नाही. तिच्यामुळेच पदार्थ बनवणाऱ्या महिलांना व्यवसाय मिळतो. पाळणाघर चालवणे म्हणजे बाहेर कामासाठी जाणाऱ्यांना मोठा आधारच असतो. आजची स्त्री ही घरी बसून कुढत नाही. ती पैसे मिळवते. ती एकटी प्रवासाला जाते, पार्लर, हॉटेलिंग, शॉपिंग तिचे आवडते आहे. सगळे सण ती पारंपरिक पद्धतीने साजरे करते. मला नेहमी असं वाटते की ही खरी स्वयंसिद्ध आहे. तुम्ही तिला काय आधार देणार? आता तर सिद्ध झाले आहे की स्त्री कुठेही कमी पडत नाही. असं एकही क्षेत्र नाही ज्यात स्त्रियांचा सहभाग नाही ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

तुम्ही तिला आधार द्याची गरज नाही. फक्त तिला कौतुकाची एक थाप पाहिजे. तिला भयमुक्त सगळीकडे फिरता आले पाहिजे. तिला अगदी देवी नको पण माणूस म्हणून समजून घ्या. आदर करा. नोकरी, व्यवसाय करणे म्हणजेच सगळं आहे असे नाही. घरी राहून पुढच्या पिढीवर योग्य संस्कार करणारी, अंतराळ मोहिमेतील शास्त्रज्ञ, संरक्षण आर्मी नेव्ही एअरफोर्समध्ये जॉईन होणारी, रिक्षा, स्कूलबस चालवणारी, रोज सकाळी रस्ते साफ करणारी, शिक्षिका, समाजकार्य तळागळतील स्त्रियांना मदत करणारी अशी कितीतरी स्त्रियांची रूपे मी पाहते तेव्हा नतमस्तक होते.

बिइंग वुमनच्या या अंकात ज्योती जोशी यांची मुलाखत आहे. पुण्याच्या मेधाताई कुलकर्णी यांच्या बद्दल लेख आहे. मेधाताईचा बिइंग वुमनशी खूप जुना संबंध आहे. याशिवाय स्त्रियांच्या विविध विषयांवर दृष्टीकोन टाकणारे विविध लेख जसे की कर्तृत्वान स्त्रिया, स्त्री मुक्ती म्हणजे काय?, आधुनिक भारताच्या विकासात महिलांचे योगदान असे अनेक वाचनीय लेख आहेत. पुन्हा एकदा महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

तू थांबू नकोस, डगमगू नकोस
कारण तू अष्टावधानी आहेस.....

**धन्यवाद.**
**रोहिणी वांजपे**
**संपादक, 'बिइंग वुमन'**



**उषा अरुण प्रभुणे**
कॅलिफोर्निया, अमेरिका
ushašprabhuneyahoo.com

# गोष्ट लग्नाची

**नुकतीच ७०च्या मे मध्ये B.Sc. झाले होते. नंतर ६ महिन्यांचा टायपिंगचा कोर्स करून परीक्षा पास झाले आणि तहसीलमध्ये नोकरी लागून ४ महिने झाले होते. अशी मी म्हटले तर मोकाटच होते. मग दाखवणे प्रकार नुकताच सुरु झाला होता. आपल्याला दाखवले की आपण लगेच पसंत पडू आणि लगेच आपले लग्न होईल अशा समजूतीत मी कधीच नव्हते. माझी मला मी कशी दिसते (बेताची) याबद्दल खात्री असल्यामुळे कशीबशी तयार होऊन मुलाच्या घरी गेले...**



साल १९७१. वेळ संध्याकाळची. सगळ्या मैत्रिणी जमलेल्या. आम्ही विटीदांडू खेळतोय. मध्येच येऊन सौ. आईने मला बोलावले. चल. आपल्याला बाहेर जायचे आहे. कुरकुरतच मी आईच्या मागे घरात आले. तेव्हा आई म्हणाली, अगं, तुला दाखवायला न्यायचे आहे. छान तयार होऊन माझ्या बरोबर चल. खरं म्हणजे मला कंटाळा आला होता. मी तशी लहान नव्हते खेळत बसायला. चांगले २१वे वर्ष चालू होते. नुकतीच ७०च्या मे मध्ये B.Sc. झाले होते. नंतर ६ महिन्यांचा टायपिंगचा कोर्स करून परीक्षा पास झाले होते आणि नुकतीच तहसीलमध्ये नोकरी लागून ४ महिने झाले होते. अशी मी म्हटले तर मोकाटच होते. त्यामुळे आता आपले लग्नाचे वय झाले आहे. M.Sc. करायला घरची परवानगी नाही. अशा परिस्थितीत दाखवणे प्रकार नुकताच सुरु झाला होता. आपल्याला दाखवले की आपण लगेच पसंत पडू आणि लगेच आपले लग्न होईल अशा समजुतीत मी कधीच नव्हते. माझी मला मी कशी दिसते (बेताची) याबद्दल खात्री असल्यामुळे कशीबशी तयार होऊन मुलाच्या घरी गेले. म्हणजे मी आणि आई अशा दोघीच.

त्या घरात मला पाहायला मुलाकडचे ४-५ जण होते. मुलाकडे त्याचे वडील, त्याच्या दोन आया आणि तो, त्याची चुलत वहिनी



आणि त्याचा मित्र असे सगळेच होते. आईची मैत्रिण जिने हे स्थळ सुचवले होते तीसुद्धा होती. या मुलाशी माझी पत्रिका ३६ गुणांनी जमली होती. मी घरात पाऊल ठेवले त्यावेळेस इतक्या लोकांना पाहून दबकूनच गेले. तसे म्हटले तर सगळेच वयस्कर वाटत होते. फक्त मुलाची वहिनीच मध्यम वयाची होती. सगळे अगदी सुशिक्षित, हुषार वाटत होते. मुलगा तर गोरा आणि दिसायला सुंदर होता. मग बघायचा कार्यक्रम झाला. जुजबी प्रश्न विचारले गेले. माझ्या मनाने मला सांगितले की तुझे काही खरे नाही. मी आणि आई एका तासाने त्यांच्या घरून निघालो तेव्हा हा विषय आता विसरायचा हे ठरवूनच.

खरं म्हणजे दाखवायचा हा काही पहिलाच कार्यक्रम नव्हता. आधी पुण्याला दोन ठिकाणी नेले होते. त्यांनी सर्वच दृष्टीने मला नको म्हटले. मग औरंगाबादला एका स्थळाशी जमले. पण बैठकीत त्या लोकांनी फार ताणले आणि इकडच्याही लोकांनी इतके ताणले की लग्न मोडले. लग्न नक्कीच जमणार म्हणून आईने पक्वान्नाचा स्वयपाक केला होता. आम्हाला वाईट वाटले. हा अनुभव लक्षात घेऊन मी थोडीशी नाराजीनेच आईबरोबर आले होते.

असे सगळे असले तरीसुद्धा दुसऱ्या दिवशी माझा सख्खा भाऊ शांताराम आणि चुलत भाऊ चंदू असे दोघे त्यांच्या घरी निर्णय विचारायला गेले. आम्हाला गावाला जायचे असल्यामुळे आम्ही सगळे त्या गडबडीतच होतो. दोन्ही भाऊ लहान तोंड करून घरात आले तेव्हा सगळ्यांनाच रिझल्ट कळला होता. त्यामुळे काहीही न बोलता सगळ्यांचीच कामे चालू राहिली. कारण मात्र त्यांनी असे सांगितले की मुलात आणि मुलीत फक्त सव्वा वर्षाचेच अंतर आहे म्हणून होकार देऊ नये असे मुलाच्या वडिलांना वाटत होते. आमच्याकडे सगळ्यांनाच राग आला. अंतर कमी आहे हे त्यांना पत्रिका पाहतानाच समजले होते. मग त्यांनी पहायचा कार्यक्रम केलाच कशाला?

रात्री पावणे अकराला अचानकच त्या मुलाची मधली आई आणि चुलत वहिनी आमच्या घरी आल्या. त्यांना पाहून आम्ही सगळेच आश्चर्यचकित झालो. पण मुलाने फारच हट्ट धरल्याने त्या फार कासावीस होऊन आमच्या घरी आल्या होत्या. त्या दोघींना आणि मुलाला मी पसंत होते. पण अजून एकदा तिच्याशी बोलून मगच काय ते ठरवू असे आमचा मुलगा म्हणत आहे. तेव्हा तुम्ही मुलीला आमच्याकडे थोडा वेळ पाठवलं का? असे विचारू लागल्या. यावेळेस मी प्रथमच त्या वयस्कर बाईकडे ही कुणीतरी चांगली बाई म्हणून पाहिले.

दुसऱ्याच दिवशी मी माझ्या धाकट्या बहिणी बरोबर त्यांच्या घरी गेले. मुलाच्या सगळ्या प्रश्नांना मी व्यवस्थित उत्तरे दिली. माझ्या आवडी निवडीबद्दल मुलाने खूप प्रश्न विचारले. त्यात 'नोकरी सोडशील का?' हे सुद्धा त्याने विचारून घेतले. 'आवश्यक नसेल तर करणार नाही' असे मी उत्तर दिल्याने तो खुश झाला. मध्ये पोहे खाणे झाले. खरं म्हणजे 'आपण सावळे, मुलगा गोरापान. दिसायला छान. मग हे कसे काय होणार?' हा विचार मनात सतत येत होता. मुलाने या प्रकारे माझी चांगलीच परीक्षा घेतली व नंतर रीतसर पसंती कळवली.

यानंतर मला अजून एक अडथळ्याचा मार्ग ओलांडायचा होता. रथसप्तमीच्या दिवशी मुलाच्या धाकट्या आईला दाखवण्यासाठी मला वैजापूरला नेले. आईला त्रास नको म्हणून मुलाने औरंगाबादहूनच श्रीखंडाचा चक्का बरोबर घेतला होता. शांताराम आणि मी मुलाबरोबर वैजापूरला सकाळीच्या सातच्या बसने निघालो. तिथे पोचल्यावर कुणाला कळू नये म्हणून मुलाने आम्हाला गावातल्या मेन रोडने न नेता बोळीतून घरी नेले. वाड्याच्या मुख्य दाराने आत न नेता छोट्या दाराने आत नेले.

वाडा खूपच प्रशस्त वाटला. आम्ही आत गेल्यावर मुलाच्या धाकट्या आईने जेव्हा मला बघितले आणि मी त्यांना पाहिले तेव्हा पहिल्या दिवसासारखीच माझी प्रतिक्रिया झाली. या मला पसंत करणे शक्यच नाही असे वाटले. त्या नुकतीच अंघोळ करून आल्या होत्या. दिसायला छान! लख्ख गोरा रंग, धारदार नाक, कुरळ्या केसांचा छोटासा अंबाडा. पण उंची मात्र बरीच कमी बुटक्यात जमा होतील अशा. मुलगी आधी दाखवायला न आणल्याने चेहऱ्यावर

दिसणारी स्पष्ट नाराजी. सगळे ठरवल्यावर आता कशाला मला दाखवयला आणले असा प्रश्न विचारणारा चेहरा!

आमच्यासाठी तरीसुद्धा त्यांनी जेवायला श्रीखंड केले. मला स्वयंपाकघरात बसवले. माझ्याकडून मधल्या सासूबाईंनी भज्यांसाठी कांदा चिरून घेतला. मुलगा शांतारामला त्याचे एम.ए.ला मेरिटमध्ये आल्यानंतर जो फोटो आला होता तो दाखवून स्वत:बद्दल आणि घराबद्दलची माहिती देत होता. माझ्या भावावर इम्प्रेशन मारायचा प्रयत्न करीत होता.

आमची जेवणे झाली. दुपारचे चार कधी वाजले ते कळले नाही. आम्हाला संध्याकाळी ४-५० ची औरंगाबादला जाणारी बस होती. मुलगा आम्हाला पोहचवायला बस स्टँडवर आला होता. त्यानंतर अपेक्षेप्रमाणे मुलाच्या धाकट्या आईने त्यांची नापसंती सांगून टाकली. त्यांच्या म्हणण्यानुसार मुलगी दिसायला सुंदर नाही. फारच रोड आहे. पहिल्या बाळंतपणाच गाल खपाटी जाऊन दात पुढे येतील.

एवढे सगळे होऊनही मुलगा त्याच्या म्हणण्यावर ठाम राहिला. लग्नाचे नक्की ठरल्यावर आणि बैठक झाल्यावर दादाने म्हणजे माझ्या मोठ्या भावाने विद्याधरने मला म्हटले, अग, पुष्पा अजूनही विचार कर. आपण आताही आपला नकार मुलाकडच्याना कळवू शकतो. अग, आजकाल मुली एका सासूला सांभाळू शकत नाहीत तर तू तीन तीन सासवांचे कसे करू शकणार? पण मुलाने, या घरातल्या सगळ्यांनी आधी मला नाही म्हणून नंतर 'आपली' म्हटले होते. मला हे सगळेच लोक चांगले वाटले होते. म्हणून मी दादाला म्हटले, अरे, मी सगळ्यांचे करू शकेन असे वाटते. त्यामुळे वेगळा विचार नको करूस.

मग दादा आणि वहिनींनी पुढाकार घेऊन पुण्यातले नवीन निघालेले 'सुयोग' नावाचे कार्यालय ठरवले. येथे कार्यालयात आल्यापासून लग्न लावून वऱ्हाड निघेपर्यंतचे सर्व विधी व्यवस्थित करून देण्याचे कॉन्ट्रॅक्ट असल्यामुळे घरच्यांना लग्नाची फार तयारी करावी लागणार नव्हती. दादाने मुलाच्या वडिलांना पत्र लिहून सगळे कळवले आणि त्यांच्या परवानगीने ते कार्यालय फायनल केले.

आईने दक्षिण यात्रेला गेली तेव्हाच त्या भागातून माझ्यासाठी लग्नाच्या साड्या खरेदी केल्या. या साड्या फारच वेगळ्या पद्धतीच्या आणि सुंदर होत्या. शालू फिक्या निळ्या रंगाचा आणि लाल गडद रंगाच्या मोठ्या काठाचा होता. सीमांत पूजनाची साडी पण गुलबक्षी रंगाचे मोठे काठ असलेली, गडद निळ्या रंगाची होती, पिवळ्या रंगावर लाल रंगाच्या बारिक चौकटी असलेली आणि लाल भडक काठाची एक साडी होती. फिक्या हिरव्या रंगाची साडी, त्यावर गडद हिरव्या रंगाच्या बारीक आणि जाड चौकटी असलेली अशी होती. या सगळ्याच साड्या अतिशय सुंदर होत्या. पुण्याला नातेवाईकांना खूप आवडल्या.

साखरपुड्याची नक्की तारीख लक्षात कशी राहिली नाही याचे आश्चर्य वाटते आणि वाईटही वाटते. लग्नाच्या आधी बहुतेक ३-४ दिवस फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आमचा साखरपुडा झाला. साखरपुड्याची साडी नगरहून आणली होती. त्या साडीवरचा ब्लाऊज वैजापूरच्या वाड्यात भाड्याने राहणाऱ्या पुष्पाताई कुलकर्णींनी लगेच शिवून दिला. साखरपुड्याला आमच्याकडचे आई, काका, माझा भाऊ अविनाश आणि मी एव्हढेच होतो. धारवाडकर नावाचा मुलाचा मित्र औरंगाबादहून आला होता. वाड्याच्या गच्चीवरच्या खोलीला असलेल्या पत्र्यावर नेऊन त्यांनी मुलाबरोबर माझे आणि अवीबरोबर एखादा असे थोडेसे फोटो काढले. त्यात मी खूप लाजलेली आणि अंग आकसून घेतलेली उभी होते. ते फोटो पाहून अजूनही हसायला येते आणि छानही वाटते.

अशा तऱ्हेने लग्नाची तारीख जवळ आली. एक मार्चला दुपारी आम्ही कार्यालयात आलो. मी उखाणे पाठ करीत होते. सगळे आयते मिळणार होते. सगळ्यांना कॉन्ट्रॅक्टचे लग्न कसे असते हे प्रथमच कळणार होते, समजणार होते आणि पाहायलाही मिळणार होते. कार्यालयात आल्यावर कोणालाच काहीही काम करावे लागणार नव्हते. त्यामुळे सगळे गप्पा मारायला मोकळे होते. मुलाकडची वैजापूरहून सकाळी निघालेली बस संध्याकाळी ६-३० पर्यंत कार्यालयात पोचणार होती. बस आणि गाडी नवऱ्या मुलासह कार्यालयात पोहचली.

आता सगळ्यांचीच धावपळ सुरु झाली. आई आणि काकांनी दहा तोळे सोने घालून, थोडाफार हुंडाही दिला होता. मुलाकडच्यांनीपण ५ तोळ्यांचा चपलाहार, ५ तोळ्यांचे तोडे,





मंगळसूत्र, नथ असे भरपूर सोनेनाणे माझ्या अंगावर घातले. अर्थात मंगळसूत्र दुसऱ्या दिवशी घालणार होते. रात्री कढी-भाताचे जेवण झाले. पक्वान्न आठवत नाही. बहुतेक सुधारस असावा. सगळा कार्यक्रम उत्तम पार पडला. सीमांतपूजनाची साडी सगळ्यांना आवडली. नवरा मुलगा दिसायला किती छान आहे, लोक किती चांगले आहेत यावर भरपूर चर्चा झाली. मीही त्यामुळे खुश होते. त्या काळात हातांना मेंदी लावणे हा प्रकार लोकप्रिय नव्हता. त्याचे इतके कौतुकही नव्हते. त्यामुळे माझ्या हातावर मीच मध्यभागी मेंदीचा एक मोठा गोल आणि त्याच्या बाजूला चार लहान गोल काढले होते. आता सगळे आठवून गंमत वाटते. रात्रीची जेवणे झाल्यावर आमच्याकडचे आणि मुलाकडचेही गावातले लोक त्यांच्या त्यांच्या घरी गेले. तरीसुद्धा दोन्हीकडचे जवळचे पाहूणेही बरेच होते जे कार्यालयातच राहणार होते. सगळ्यांची झोपायची सोय लावून आमच्याकडचे लोकपण झोपले

सकाळी १०.४६चा मुहूर्त होता. त्यादिवशी गुरुवार होता. आमच्याकडचे आणि मुलाकडचेही देवब्राह्मण बहुतेक त्याच दिवशी झाले होते. मुलाच्या तीन आया या कार्यक्रमासाठी कशा बसल्या आहेत हे पाहण्याची उत्सुकता सगळ्यांना होती. त्यामुळे बरेच जण तेथे जमले होते. मी लग्नासाठी तयार झाले तेव्हा मी साधी वेणी घातली होती. आमच्या ओळखीच्या एक बाई माझ्याजवळ आल्या आणि त्यांनी माझ्या केसांची फारच वेगळ्या पद्धतीची हेअरस्टाईल केली. लग्नाला मी जेव्हा उभी राहिले तेव्हा त्या हेअरस्टाईलचे सगळ्यांनीच कौतुक केले. लग्नाला खूपच गर्दी झाली होती. लग्न अगदी वेळेवर लागले. दोन्ही कडचे खूप लोक असल्याने भेटायला आणि शुभेच्छा द्यायला सगळ्यांनाच खूप वेळ लागला. खूप फोटो काढून झाले. नंतर होमाचे विधी सुरु झाले. त्याही वेळेस हे विधी पाहण्यासाठी बायका बसल्या होत्या. गळ्यात मंगळसूत्र आले. चपलाहार आला. नाकात नथ आली. हेअरस्टाईल केलेल्या अंबाड्यावर सोन्याचे गुलाबाचे फुल आले. मुलाची बायको झाल्याने नवऱ्यामुलाचे माझ्याकडून 'अहो' रुपांतर झाले. मुलाच्या तिन्ही आया आता माझ्या मोठ्या सासूबाई, मधल्या सासूबाई आणि धाकट्या सासूबाई झाल्या. सगळीच नवीन नाती तयार झाली. माझ्या चुलत जाऊबाईनी माझ्या पायात जोडवी आणि विरोद्या घातल्या. (मला होकार देण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यांचे आणि माझे संबंध त्या असेपर्यंत नेहमीच जिव्हाळ्याचे राहिले.) त्यानंतर सुनमुख पाहण्याचा कार्यक्रम फारच छान झाला. तिघींनीही अतिशय कौतुकाने आणि समाधानाने आरश्यात आमच्या दोघांचे चेहरे पाहिले. मुख्य नवरा, नवरीची पंगत बसायला दुपारचे साडेतीन वाजले. जेवतांना मी हिरवी साडी नेसली होती. टेबल खुर्चीवरची पंगत होती. सगळ्यांना हा अनुभव नवा असल्याने वेगळेच वाटत होते. घास घालायचा कार्यक्रम झाला. विहिणीचे गाणे झाले. आग्रह झाला.

आता कार्यालयातले लक्ष्मीपूजन झाले. महालक्ष्मीचा मुखवटा कळशीवर ठेवून साडी नेसवून आमच्या दोघांच्या हातून तिची पूजा करवून घेतली. आता नाव ठेवण्याचा सोहळा सुरु झाला. यांचे नाव 'अरुण' असल्याने त्यांनी माझे नाव 'उषा' ठेवले. नंतर अन्नपूर्णा आणि गोपाळकृष्णावर आंबा शिंपणे झाले. रुखवताचे सामान त्यांच्याकडच्या कुणीतरी व्यवस्थित भरून घेतले.

नंतर दुपारचा चहा झाला. आता वैजापूरला परतण्याची सगळ्यांनाच घाई झाली. आमची बस आठ, सव्वा आठच्या सुमारास निघाली. रात्री साधारण दीडच्या सुमारास आमची बस वैजापूरला पोहचली. मी माप ओलांडून पहिले पाऊल उंबऱ्याच्या आत टाकले. इतक्या रात्री परत घरातले लक्ष्मीपूजन आमच्या हातून केले आणि मी गृहलक्ष्मी झाले!

पुष्पा पानसेची उषा प्रभुणे अशी झाली!


**उषा अरुण प्रभुणे**

**कॅलिफोर्निया, अमेरिका**

ushašprabhune@yahoo.com


***



# अष्टपैलू राजकारणी

# मेधा कुलकर्णी

ज्या समाजात आपण राहतो, वाढतो, रुजतो त्या समाजाचे आपणही काही देणे लागतो ही सामाजिक बांधीलकीची भावना मनामध्ये जपत सामाजिक काम करणारी काही मोजकीच व्यक्तिमत्त्वं असतात. असंच समाजकार्यात स्वतःला वाहून घेतलेल्या 'मेधा कुलकर्णी'.

राजकारणातील एक आघाडीचे नेतृत्व करणाऱ्या, लोकांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यावर योग्य ती अंमलबजावणी करणाऱ्या आणि सामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणाऱ्या मेधा कुलकर्णी.

मुळात पेशाने प्रोफेसर असणाऱ्या मेधाताई यांना आपण राजकारणात जाऊ असं कधी वाटलं नव्हतं. सन २००२ मध्ये काम करत असताना अचानक त्यांना ही संधी लाभली. त्या वेळी भारतीय जनता पक्षातर्फे कोथरूड विभागातून महिला उमेदवार (शकतो शिक्षिका असलेली) अशी हवी होती आणि त्या वेळी त्यांना मेधा कुलकर्णी यांची निवड केली.

त्यांच्या घरातील वातावरण हे संघ परिवाराचे असल्यामुळे समाजकार्य यासाठी त्यांना कुठेही आडकाठी आली नाही किंबहुना तिकिटासाठी जेव्हा त्यांना विचारण्यात आलं त्या वेळी घरातून भक्कम पाठिंबा लाभला. कोणी तरी येऊन काहीतरी करेल ही अपेक्षा ठेवण्यापेक्षा आपण स्वतः पुढे होऊन हे कार्य करावं या दृष्टिकोनातून त्यांनी या उमेदवारीसाठी अर्ज भरला.

कोणतीही पार्श्वभूमी नसताना मनात समाजकार्याची भावना ठेवून सुरू केलेल्या या कार्याला जनतेचाही उदंड प्रतिसाद लाभला आणि भरघोस मतांनी मेधा कुलकर्णी या नगरसेविका पदावर निवडून आल्या. इथून त्यांनी पुन्हा कधीच मागे वळून पाहिलं नाही. नगरसेविका पदावर असताना विविध प्रश्नांवर अगदी नागरिकांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळवून देण्यासाठी त्या सक्रिय राहिल्या. माणसाचं काम बोलतं असं म्हटलं जातं हेच मेधाताईंबाबत घडलं. प्रत्येकाचे प्रश्न जाणून घेऊन त्यावर योग्य ती अंमलबजावणी करत त्यांनी विविध कामे पूर्ण केली. प्रेमळ स्वभाव, प्रत्येकाची आपुलकीने चौकशी, प्रसन्न भावमुद्रा आणि हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेण्याची महत्त्वाकांक्षा या विविध पैलूंमुळे त्या लोकप्रिय नगरसेविका झाल्या. नियोजनपूर्ण काम ही त्यांच्या कामाची खासियत आहे. मेधाताई नेहमी सांगतात, की कोणताही काम करताना पूर्वनियोजन आणि पूर्ण नियोजन या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

नगरसेविका ते आमदार असा चढत्या आलेखाचा टप्पा त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने, मेहनतीने, विविध अडचणींवर मात करत यशस्वीपणे पार केला आहे. या कालावधीत त्यांनी विविध पदेही भूषविली आहेत. जीवनातील या प्रत्येक टप्प्यावर कुटुंबीयांची उत्तम साथ त्यांना वेळोवेळी लाभली आहे किंबहुना लाभत आहे. म्हणूनच आपल्या यशात कुटुंबीयांचा मोलाचा वाटा आहे, हे त्या आवर्जून सांगतात.

राजकारणासारख्या व्यापक क्षेत्रात काम करत असताना, अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी कुटुंब, नोकरी आणि राजकीय क्षेत्र याचा योग्य तो समतोल सांभाळला आहे. नानाविध गोष्टी करत असतानाच वाचन, गाणी ऐकणे, चित्र काढणे, फोटोग्राफी असे अनेक छंद त्या सवड काढून जपत असतात.

स्त्री ही एकाच वेळी विविध भूमिका उत्तमरीत्या पेलवू शकते तिची तेवढी क्षमता असते हे त्या आवर्जून सांगतात. म्हणूनच प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या आतला आवाज ओळखणं अत्यंत महत्त्वाचे आहे. करिअर आणि घर या दोन्ही गोष्टी सांभाळताना जिथे ज्या गोष्टीला जेव्हा प्राधान्य देणं गरजेचं आहे ते दिलंच गेलं पाहिजे. सगळ्या गोष्टींचा समतोल राखला गेला पाहिजे. कोणतीही गोष्ट शिकताना त्याच्या मुळापर्यंत जा, स्वतःला कमी लेखू नका. उत्तम बुद्धिमत्ता म्हणजे यशस्विता नाही यशस्वी होण्यासाठी विविध पैलू असणंही गरजेचं असतं. स्वतःला घडवा, सक्षम बना आणि आपल्याबरोबर देशाच्या विकासाचा जरूर विचार करावा, असं मत मेधाताई यांनी व्यक्त केलं. मेधाताई यांचे कार्य हे अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.

मेधाताईंच्या कार्याचा आलेख हा दिवसेंदिवस वाढत आहे. नवनवीन शिखरे त्या पादाक्रांत करीत आहेत. एक स्त्री नक्कीच यशस्वी होऊ शकते हे त्यांच्या कार्यातून दिसून येते. मेधाताइ तुम्हाला पुढील वाटचालीसाठी खूप शुभेच्छा!

बिइंग वुमन करत असलेल्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. त्या नेहमीच बिइंग वुमनच्या कार्यात सहभागी होत असतात.

राज्यसभेच्या खासदार पदासाठी मेधाताईंची निवड झाली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन

**टीम बिईंग वुमन**

***



मोहन जोशी



# खंबीर 'ती'

सगळ्यांचे आयुष्य सारखे नसते. चढ-उतार येत असतात. पण या सगळ्या घटना आपण कोणत्या दृष्टिकोनातून बघतो हे सगळ्यात महत्त्वाचे ठरते. सकारात्मकता ठेवली आणि आहे ती परिस्थिती स्वीकारून कुटूंबाला सांभाळत पतीची साथ देत पुढे जात राहिलं की आयुष्य खूप सुंदर पद्धतीने फुलवता येत हे मात्र नक्की. असंच स्वतः आंनदी राहून, कुटुंब सांभाळून, पतीला त्यांच्या क्षेत्रात सहकार्य करत जीवन आनंदाने बहरवणाऱ्या, प्रत्येक प्रसंगात खंबीर असणाऱ्या सौ. ज्योती मोहन जोशी.

मोहन सर आणि ज्योती मॅडम यांचे बालपण एकत्र गेले. एकाच वाड्यात राहत असल्याने एकमेकांशी ओळख होतीच. दोन्ही कुटुंब देखील एकमेकांना माहिती होती. त्यामुळे आता तुम्ही दोघे लग्न करा अशी विचारणा घरातून झाली. पण त्यावेळी दोघांचेही शिक्षण चालू असल्याने लग्न वगरे याबाबत विचार देखील डोक्यात नव्हता. दोघेही एकत्र कुटुंबात वाढलेले असल्याने त्यांच्यावर खूप सुंदर संस्कार झालेत हे ज्योती मॅडम आवर्जून नमूद करतात. सरतेशेवटी सगळ्यांचा होकार झाला आणि मोहन सर आणि ज्योती मॅडम यांची लग्नगाठ बांधली गेली. नोकरी असावी की नसावी हे त्यांनी कधी विचारले नाही. त्यावेळी मोहन सरांना किर्लोस्कर कंपनीत नाटकाच्या पार्श्वभूमीवर नोकरी लागली होती. कलाक्षेत्रात सरांचा प्रवास चालू होता. वेळेचे अनिश्चित असे हे क्षेत्र त्यामुळे सरांना बऱ्याच वेळेला बाहेर जाणे भाग होते. तेव्हा घरातील एक व्यक्ती बाहेर आहे तर कोणीतरी एकाने घरी राहून सर्व जबाबदाऱ्या सांभाळणे गरजेचे आहे हा विचार करून ज्योती मॅडमने संपूर्ण घराची जबाबदारी स्वीकारली. त्यावेळी त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय होता तो ज्योती मॅडम सांभाळत असत. त्यासोबत त्या काही प्रदर्शनाचे आयोजन करीत असत. एक टर्निंग पॉईंट असा येतो की अचानक सगळे बदल होतात. ट्रान्सपोर्ट क्षेत्रात एक प्रसंग घडला आणि हा व्यवसाय बंद करण्याचा निर्णय दोघांनी घेतला. घडलेल्या घटनेचा मोहन सरांना खूप मोठा धक्का बसला होता पण ज्योती मॅडम यातही खंबीरपणे त्यांच्यासोबत उभ्या होत्या. मोहन सरांच्या करिअरच्या दृष्टीने मुंबईला शिफ्ट होण्याचा निर्णय त्यांनी घेतला. इथेही चेंबूर/अंधेरी ईस्ट-वेस्ट असा प्रवास झाला. सर कामात बिझी असल्याने मुलांची शिक्षण, घरातील बारीकसारीक गोष्टी, कौटुंबिक कार्यक्रम, घराचे शिफ्टिंग अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी उत्तमरित्या पार पडल्या. यातही अनेक चढ-उतार आले पण ज्योती मॅडमनी सर्वांवर मात करत सर्व सांभाळून नेले. मोहन सरांच्या कामावर परिणाम नको व्हायला किंबहूना त्यांच्या अत्यंत व्यस्त वेळात डिस्टर्ब व्हायला नको म्हणून अनेकदा अनेक अडचणींवर त्यांनी एकटीनेच मार्ग शोधले आहेत. तुम्ही कामावर लक्ष केंद्रीत करा, घरची काळजी करू नका, मी आहे हा ज्योती मॅडमचा खंबीर पाठींबाच मोहन

सरांना यशस्वी होण्याकडे नेत होता. मधल्या काही कालावधीतनंतर गौरीनंदन प्रोडक्शन हाऊसची स्थापना केली. गौरीनंदनतर्फे अनेक नाटक, मालिका, यांची निर्मिती करण्यात आली आणि याची संपूर्ण जबाबदारी ज्योती मॅडमने सांभाळली. पुणे-मुंबई असा प्रवासात खूप गोष्टी घडल्या पण ज्योती मॅडमने मोहन सरांची साथ कधीच सोडली नाही किंबहूना त्या प्रत्येक ठिकाणी त्यांच्यासोबत खंबीरपणे उभ्या होत्या. मुलांची शिक्षण, लग्न याही गोष्टी त्यांनी मोहन सरांच्या साथीने उत्तमरीत्या पार पाडल्या. तसं बघितलं तर कामासाठी सर सतत बाहेर असायचे त्यामुळे दोघांना एकमेकांसाठी विशेष वेळ देता आला नाही पण म्हणून त्यांच्या प्रेमात, नात्यात यत्किंचितही फरक पडला नाही. दोघांचा एकमेकांवर असणारा विश्वास, एकमेकांना त्यांच्या कामात सपोर्ट करणं, एकमेकांना समजून घेणं या गोष्टींची जोड होती म्हणून हे नातं दिवसागणिक बहरत गेलं यात काही शंकाच नाही. छोट्या मोठ्या कारणावरुन वाद करून नात टोकाला नेण्यात कोणताही अर्थ नाही हे त्या आवर्जून सांगतात. एकमेकांना समजून घेतलंच पाहिजे तरच संसार फुलतो, कुठे कधी माघार घेण्याची वेळ आली तर त्याने तुम्ही लहान ठरत नाही उलट तुम्ही तुमच्या नात्यातील प्रेम, विश्वास अधिक घट्ट करता हे ही त्या सांगतात. मोहन सरांच्या करिअरसाठी ज्योती मॅडमने स्वतःचे करिअर मागे ठेवत कुटूंबाला प्राधान्य दिले, घर सजवले यात कोणताही कमीपणा वाटत नाही उलट हे सगळं सक्षमपणे त्यांनी सांभाळले याचा अभिमानच वाटावा असे आहे हे मात्र निश्चित. ज्योती मॅडमना फिरण्याची अत्यंत आवड आहे वेळ मिळेल तेव्हा कुटुंबासोबत, सरांसोबत, मैत्रिणीं सोबत त्या त्यांची आवड जोपासत असतात. आज अनेक स्त्रिया घर, सणवार सांभाळून स्वतःचे करिअर करतात याचे त्यांना खरोखरच कौतुक वाटते. प्रत्येक स्त्री वेगळी आहे, तिची परिस्थिती वेगळी आहे, त्यामुळे प्रत्येकीला आपण साथ दिली पाहिजे, प्रोत्साहन दिले पाहिजे हेही त्या आवर्जून सांगतात. कोणत्याही स्त्रीची संपूर्ण बाजू समजून न घेता तिच्याविषयी काही बोलणे चुकीचे आहे हे त्यांचे मत त्यांनी सांगितले. ज्योती मॅडम तुम्ही सर्वांसाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहात.






घर-व्यवसाय-नाती कशी जपावीत आणि एक आदर्श पती-पत्नीच नात कसं असावं हे तुमच्याकडून शिकण्यासारखे आहे. खरंच घर सांभाळणं आणि पतीला त्याच्या क्षेत्रात काम करण्यासाठी संपूर्णपणे सहकार्य करणं हा निर्णय घेण्यासाठी खूप मोठे मन आणि धाडस लागतं आणि ज्योती मॅडम तुम्ही ते केले आणि निभावलं देखील ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. एका यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते हे विधान तुम्ही सिद्ध केले आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. आजच्या महिला दिनाच्या निमित्ताने तुम्ही मोहन सरांना देत असलेल्या खंबीरसाथीसाठी तुम्हाला बिइंग वुमनचा एक सलाम...

**मुलाखत / शब्दांकन**
**सौ. चित्राली ओक-कुलकर्णी**

***




**सौ. श्रिया कुलकर्णी**
पुणे


# स्त्रीमुक्ती म्हणजे नेमके काय?

स्त्रीमुक्ती या विषयाला अनेक कंगोरे आहेत. स्त्रीमुक्ती या विषयाचा आवाका खूप मोठा आहे. महिलांना स्त्रीमुक्ती चळवळीची आवश्यकता का भासली, याचे उत्तर शोधले की स्त्रीमुक्ती म्हणजे काय याची जाणीव होऊ शकेल. स्त्रीमुक्ती चळवळीला अनेक पैलू आहेत. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे या प्रकारच्या चळवळीची आवश्यकता भासली असावी. पुरुषप्रधान व्यवस्थेत महिलांना दुय्यम दर्जाचे स्थान दिल्याची जाणीव झाल्याने महिलांना अशा चळवळीची गरज भासली. तसेच धार्मिक, सांस्कृतिक, बौद्धिक, आर्थिक अशा कित्येक क्षेत्रांमध्ये महिलांना स्वतःचा असा ठसा उमटविण्याची कुवत असूनही पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे त्या त्या क्षेत्रात महिलांना वाव दिला गेला नाही याचीही खंत होती. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा पगडा असल्यामुळे महिला विचार करू शकतात यावर विश्वासच ठेवला जात नसे. स्वयंपाक खोली, तसेच बाळंतपणाची खोली एव्हढेच त्यांचे क्षेत्र ठरवून दिले होते. हळदीकुंकू समारंभ तसेच देवळात जाण्याकरिता देखील घरातील ज्येष्ठ महिलावर्गाची आर्जवी करून परवानगी घ्यावी लागायची. मैत्रिणींबरोबर/समवयीन महिलांबरोबर गप्पा मारायला अथवा एकमेकींच्या घरी जायला-यायला मोठ्या मिनतवारीने परवानगी मिळायची; पण त्याचबरोबर त्यानंतर टोमण्यांची बरसात व्हायची. स्वयंपाकघराबाहेर येऊन पुरुषांशी बोलायची परवानगी नसे. खिडकीच्या बाहेर पाहायची परवानगी नसायची. घरातील ज्येष्ठ महिलांच्या नजरेच्या धाकात दळणकांडण करावे लागायचे जेणेकरून महिलांच्या मनात काही वेगळे विचार येऊ नयेत. दारात विविध प्रकारची फुलझाडे असूनही फुले फक्त देवासाठी आहेत, ती केसात माळायची नाहीत असा दरारा असे. नटणे, मुरडणे ही तर स्त्रीची स्वाभाविकता; पण हा प्रकार अशक्यच होता. नवऱ्याशी बोलतानादेखील स्वयंपाकघराच्या दाराआड उभे राहून बोलावे लागत असे. अपत्य किती व्हावीत याबाबतही बायकोचे मत कधीच विचारात घेतले गेले नाही. परपुरुषाशी बोलणे हे पाप समजले जायचे. तिला सर्वांत त्रास होत असावा तो समाजातील मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले गेले.  तसेच बाला-जरठ विवाह, विधवांचे केशवपन इत्यादी चालीरीतींचा त्रास होत होता. विधवांचे केशवपन ही चाल त्या काळातील स्त्रियांना मनस्ताप देणारी होती. स्त्रीसौंदर्याचे लक्षण असलेल्या केशकलापाचे वपन करणे हे खरंच घृणास्पद तसेच अमानवी होते. एखाद्या महिलेचा नवरा गेला तर त्याच्या पत्नीला विद्रूप करणे हे रानटीपणाचे लक्षण आहे, याची जाणीव महिलांना झाली. महिला सुंदर दिसली की तिचा पाय घसरू शकतो, असा युक्तिवाद त्या वेळच्या पुरुषप्रधान समाजाच्या धुरीणांनी दिला म्हणून महिला विधवा झाली की तिला विद्रूप केले जायचे.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापर्यंत महिलावर्ग हा समाजातील दुर्लक्षित घटक होता. चूल आणि मूल ही दोनच क्षेत्रं तिच्याकरिता उपलब्ध होती. रांधा, वाढा, उष्टी काढा व घराला वारस देणे यापुरतेच तिचे आयुष्य सीमित होते. विषयवासनेची तृप्ती म्हणून तिच्याकडे पहिले जायचे. तिची हौस-मौज, तिच्या आवडी-निवडी याबद्दल तिला बोलण्याची परवानगी नसायची. स्त्रीसुलभ नटणे-मुरडणे ही केवळ अशक्य गोष्ट होती. पण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या गोष्टी बदलण्याचे हळूहळू संकेत मिळू लागले. त्या काळातील रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुलेंसारख्या कित्येक महिलांनी स्त्रियांच्या या प्रतिमेला छेद द्यायचे ठरविले. त्याचबरोबर सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित यांसारख्या महिलांनी स्त्रियांना समाजात मनाचे स्थान मिळावे म्हणून सर्वतोपरी मदत केली. फार पूर्वीपासून महिलांची असलेली चौकट म्हणजेच रांधा, वाढा, उष्टी काढा व घराला वारस देणे या पारंपरिक ओळखीतून समस्त महिला वर्गाला बाहेर काढण्यासाठी अनेक महिलांनीच कंबर कसली. त्यांनी पुरुषवर्गाविरुद्ध बंडाचे निशाण दाखविण्याऐवजी पुरुषवर्गाच्या मदतीने महिलावर्गाची प्रगती/उन्नती करण्याचा मानस मनी बाळगला.

या सर्वांचा परिपाक म्हणून स्त्रीमुक्ती चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. स्त्रियांची चळवळ उभी राहिली ती स्त्रीच्या मनाच्या कोंडमाऱ्यातून. स्वाभिमान, आत्मविश्वास, स्त्रीसुलभ इच्छा इत्यादी गोष्टींना मुरड घालून जेव्हा जगणे अशक्य होऊ लागले त्या वेळेस चळवळीची गरज निर्माण झाली. तसेच स्त्रियांचे समाजातील स्थान अधोरेखित करण्यासाठी अशी चळवळ आवश्यक होती. स्त्रियांच्या प्रश्नांना/समस्यांना वाचा फोडण्याचे काम या चळवळीने केले. प्रत्येक महिला स्वतंत्र विचारांची झाली. तिचे निर्णय तिने स्वतः घेण्याचा अधिकार या चळवळीने तिला दिला. या चळवळीचा आणखी एक फायदा म्हणजे सामाजिक क्रांती होऊन समाजाला स्त्रियांचे महत्त्व कळू लागले. स्त्रियांवरील रांधा, वाढा, उष्टी काढा यावरील बंधने हळूहळू सैल होऊ लागली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या सर्वांचा परिपाक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिले आहेत.



त्या काळच्या तथाकथित पठडीतून त्यांनी समाजाला बाहेर काढून उन्नतीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला. महिलावर्गाला वर उल्लेख केलेल्या चौकटीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याचे काम रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुलेसारख्या कित्येक महिलांनी मनापासून केले. या सर्व महिला सुधारकांनी वेळीच शिक्षणाचे महत्त्व ओळखले. विचारप्रणाली विकसित झाली तर स्त्री चौकटीतून बाहेर येऊ शकेल यावर या महिला सुधारकांची खात्री होती. कित्येक सुधारक महिलांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून पुरुषप्रधान समाजव्यवस्था असूनही महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे, याचा आग्रह धरला. त्यानुसार रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुलेंसारख्या कित्येक महिलांनी स्त्री शिक्षणाची कळकळ असणाऱ्या आपापल्या नवऱ्याकडून शिक्षणाचे प्राथमिक धडे घेतले. त्या काळी समाजाचा असलेला कडवा विरोध पचवून महिला शिक्षणाचे कार्य पुढे नेण्याचा चंग मनाशी बांधला. सुरुवातीला घरातील पुरुषांच्या भीतीखाली तसेच दडपणाखाली असल्यामुळे महिलांनी सुरुवातीला येण्याची असमर्थता दर्शविली. पुरुषप्रधान समाजाने त्याच्या या शिक्षणाच्या धिटाईला विरोध केला. त्यांच्या या कार्यात अनंत अडथळे आणले. समाजाने त्यांना वाळीत टाकायची धमकी दिली. पण शिक्षण घेणाऱ्या महिलांनी ठामपणे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. महात्मा जोतिबा फुले तसेच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे सारख्या सुधारक विद्वानांच्या मदतीने त्यांनी स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा केला. शिक्षणाशिवाय प्रगती/विकास अशक्य आहे हा विचार डोक्यात ठेवून १८४८ साली महात्मा जोतिबा फुले यांनी महिलांसाठी पहिली शाळा सुरू केली. स्त्रियांसाठी शाळा सुरू केली म्हणून पुरुषप्रधान समाजाकडून मोठ्या प्रमाणात विरोध तसेच अवहेलना सहन करावी लागली. तशी कल्पना त्यांनी सावित्रीबाई फुलेंना दिली होती. स्त्रीशिक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या सावित्रीबाईंना तर अक्षरशः चिखलफेक देखील सहन करावी लागली. त्या काळच्या समाजधुरीणांनी स्त्रीशिक्षण विरोधात सावित्रीबाई फुलेंच्या या कामात मोठ्या प्रमाणावर व्यत्यय आणण्यास सुरुवात केली. पण त्या दोघांनी महिलांना शिक्षित करण्याचा आपला प्रयत्न सोडला नाही.

शिक्षणामुळे विचार करण्याच्या कक्षा रुंदावत असल्यामुळे शिकलेली मुलगी/महिला नुसत्या आपल्या घराचाच विचार न करता आपल्या समाजातील इतर घटकांचा विचारही करते. काही मुलींनी लहानपणापासून पुरुषप्रधान क्षेत्रात म्हणजेच पोलीस दलात, नौदलात, हवाईदलात, भूदलात इत्यादी वेगवेगळ्या सेवा दलात आपली वर्णी लागावी म्हणून प्रयत्न करून त्या आपले स्वप्न अस्तित्वात आणतातच पण इतर मुलींसमोर आदर्शही ठेवतात. अशा मुलींकडून उत्तेजन घेऊन बाकीच्या मुली हे स्वप्न पाहतात व ते अस्तित्वात आणण्यासाठी धडपडतात  तसेच भारतीय अंतराळ संशोधन या संस्थेच्या चांद्रयान-२ तसेच मंगळयान या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात महिला वैज्ञानिकांनी महत्त्वाचा वाटा उचलून भारतीय महिलांचे स्थान उंचावले आहे. मंगळ तसेच चंद्र या ग्रहावरील छायाचित्रे प्रसारित करून सकल विश्वातील मानव वर्गाची एक प्रकारची सेवा करून भारताचे नाव जगात दुमदुमत ठेवले आहे. यावरून एक लक्षात येते की संशोधन क्षेत्रातही महिला आघाडीवर राहून यशस्वी होत आहेत. पुरुषांनाही महिलांचे महत्त्व पटू लागले. महिलांनीही शिक्षण, बुद्धिमत्ता, शौर्य इत्यादी विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करू शकतो, याची जाणीव समाजाला करून दिली.

***



**ऐश्वर्या**
पुणे

# तव ठायी...

तू शक्ती राघवाची
तू भक्ती केशवाची
प्रीतीचा संगम होशी
शिवाच्या...

जरी वेदना तनाची
तरी साधना मनाची
पराकाष्ठा होई कधी
सहनशक्ती...

वारसा सृजनातेचा
तू उपज शारदेचा
शून्य पूर्णत्वाचे चक्र
तव हाती...





बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women

9822 86 2255
8552 85 7779
8308 40 4455
editorial@thebeingwoman.com

# कर्तृत्ववान महिला




**सौ. दीप्ती मिलिंद कल्याणकर**
नेरूळ, नवी मुंबई




कर्तृत्ववान महिला म्हणजे काही विविक्षित महिला असे म्हणणे उचित ठरणार नाही. व्यापक दृष्टिकोन ठेवून या विषयाकडे पाहिले पाहिजे. आजच्या आधुनिक काळात पुरुषप्रधान संस्कृतीतही अनेक आघाड्यांवर प्रत्येक महिलेला आपले स्वत्व जाणवून द्यायचे असते. आपणही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काहीतरी करू शकतो हा विचार तिला पटवून द्यायचा असतो. गेल्या कित्येक वर्षांपासून चूल-मूल सांभाळणारी म्हणून महिलांची जी प्रतिमा जनमानसात रुजली आहे ती प्रतिमा महिलांना खटकते आहे त्यात आमूलाग्र बदल व्हावा ही मानसिकता महिलांच्यात निर्माण झाली आहे. हा विचार मनात ठेवून आजची महिला स्वतःच्यात बदल करून घेण्याच्या मनःस्थितीत आहे हे नक्की. हा तिच्यात होत असलेला बदल हा सकारात्मक आहे का नकारात्मक ही गोष्ट सर्वस्वी तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. जीन्स व टीशर्ट घालणारी महिला ही तिच्या सोयीकरिता हा पेहराव धारण करते या दृष्टिकोनातून पाहिल्यास तिच्या आधुनिक विचारसरणीची ओळख पटते. महिलांवरील पारंपरिक बंधनांच्या संदर्भात ती कधी कधी बंडखोर पण होते. पण हेही लक्षात ठेवणे गरजेचे आहे की ती पारंपरिकता व आधुनिकता याचा मेळ घालून स्वतःला जास्त अद्ययावत ठेवण्याच्या प्रयत्नात असते. हा मेळ घालणे म्हणजेच परिपक्वता अंगी बाळगण्याची सुरुवात असावी. अशा वेळेस ती पारंपरिकतेपेक्षा सोयीचा जास्त विचार करते. नेहमी कुर्ता पायजमा, जीन्स टीशर्ट किंवा तत्सम पेहराव करणारी महिला गुढी पाडव्याच्या शोभा यात्रेत नऊ वारी साडी नेसून नाकात नथ घालून स्कूटर/मोटरसायकल ही चालवते. वस्तुतः महिलांना नटायला मुरडायला आवडते. ती तर महिलांची उपजत आवड आहे, पण जबाबदारीचे/वेळेचे बंधन असलेले काम असेल तर आजची महिला नटण्या-मुरडण्यापेक्षा सोयीला प्राधान्य देते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे अशी जबाबदारीची कामे करताना स्वतःच्या पेहरावाबद्दलही जागरूक असते. पेहरावही साधा असला तरीही असा असतो की काम उरकताना पुरुषी नजरा बेचैन करणार नाहीत याची त्या काळजी घेतात. पण एक नक्की आजची महिला सडेतोड आहे. आजची महिला जरी सडेतोड असली तरी स्वतःहून कोणाचा कधीच अपमान करत नाही हे ही तेव्हढेच खरे. पुरुष वर्गाचा अपमान/तिरस्कार करणे हा विचारही तिच्या मनात नसावा. वेळप्रसंगी पुरुषांची मदत घेऊन ती आपले ईप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात असते. नोकरी-व्यवसाय आणि घर या दोन्ही गोष्टींचा मेळ घालताना तिची तारांबळ उडत असते पण त्यातूनही ती मार्ग काढून दोन्ही आघाड्यांवर यशस्वीपणे आपली जबाबदारी चोखपणे पार पाडण्याचा प्रयत्न करीत असते व यशस्वीही होते. सर्वांत मुख्य म्हणजे दोन्ही आघाड्या सांभाळताना हसतमुखाने आल्या प्रसंगाला तोंड देत असते. बहुतांशी नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांबद्दल असे सांगता येईल की त्या लवकरात लवकर काम आटोपून घरी लवकर कसे जाता येईल या विचारात असतात. घर आणि नोकरी-व्यवसाय या दोन्ही गोष्टींचा विचार केला तर महिलांचा त्यांच्या 'घरा'कडे जास्त ओढा असतो, घरात आनंद आणि शांतता कशी नांदेल याची ती काळजी घेते. पण याचा अर्थ असा नव्हे की महिला कामाकडे लक्ष देत नाहीत. महिला कामाची पूर्ण माहिती करून घेऊन ते काम लवकरात लवकर चांगल्या रीतीने कसे यशस्वीपणे पूर्ण करता येईल याचाही विचार करतात व अमलातही आणतात. ह्या विचाराच्या महिला सहसा पदाचा गैरवापर करून गोंधळ घालत नाहीत. त्या व त्यांचे काम या



पलीकडे त्या बघत नाहीत. आजच्या महिला स्वतःच्या आई-वडिलांना तर सांभाळतातच पण त्याचबरोबर त्या सासू-सासऱ्याचेही तितक्याच प्रेमाने करतात. महिला कामात कितीही मग्न असल्या तरी वेळात वेळ काढून घरी फोन करून घरातील मंडळींची विचारपूस करतातच. एकल कुटुंब असेल तर वेळ मिळेल तेव्हा वरचेवर फोन करून मुलांची त्यांची शाळा/जेवण याची विचारपूस करतात. असे सगळे करताना या महिला नकळतपणे प्रत्येक आघाडीवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीतच असतात. घरात काही मतभेद/भांडणं झाली तर तो प्रकार सामंजस्याने सोडविण्याकडे घरातील महिलेचा कल असतो. मुळात तिला घरात अशांतता पटतच नाही. घरातील माणसांबद्दल एक प्रकारची आपुलकी असते. आपुलकी हा शब्द काही जणांना खटकेल पण त्याचे कारण त्या महिलेला आलेले अनुभव. घरात कितीही मतभेद असतील तरी त्याकडे दुर्लक्ष करून ते मतभेद वाढून विकोपाला जाणार नाहीत याची ती पुरेपूर काळजी घेते.

आज जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात स्व कर्तृत्वाच्या बळावर महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्वतःची परिपक्वता सिद्ध करीत आहे. केवळ पुरुषांसाठी म्हणून ओळखल्या गेलेल्या कितीतरी क्षेत्रात महिलांनी स्वतःचा असा ठसा उमटविला आहे. उदाहरणार्थ चालक (विमान, रेल्वे, बस इत्यादी), वाहक, कुस्ती इत्यादी पुरुषप्रधान क्षेत्रात शिरकाव करून नैपुण्य मिळविले व स्वतःला सिद्ध केले. काही क्षेत्रात तर महिलांनी आपल्या अंगभूत गुणांनी त्याचबरोबर स्वबळाने तसेच स्वकर्तृत्वाने अत्युच्च स्थान मिळवून ते स्थान जबाबदारीने यशस्वीपणे सांभाळीत आहेत. राष्ट्रपती, पंतप्रधान या पदापासून तसेच विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे अध्यक्ष/मुख्य प्रशासकीय अधिकारी अशा निरनिराळ्या महत्त्वाच्या तसेच जबाबदारीच्या पदांवर यशस्वीपणे काम करून महिलांनी आपल्या अंगभूत गुणांची चुणूक दाखविली आहे, दाखवीत आहेत. आपल्या न्याय हक्कासाठी जागरूकपणे लढण्याचे बळ आजच्या महिलांच्या मनात निर्माण झाले आहे अथवा महिलांनी संघटित होऊन अथक प्रयत्नाने ते आत्मसात केले आहे. त्याचबरोबर स्वतःची प्रगती तसेच महिलांचा सर्वांगीण विकास व्हावा, या भावनेने एकत्र येऊन महिलांच्या कायदेशीर हक्कांसाठी सरकारकडे दाद मागितली व आपल्या संघशक्तीची ताकद दाखविली. त्याला अनुसरून सरकारने कायद्यात बदल तर केलाच पण त्याचबरोबर महिलांचे हक्क तसेच न्याय संरक्षणासाठी कायदेही अस्तित्वात आणले. या कायद्यांमुळे समस्त महिला वर्गाला कायद्याचे सर्वंकष संरक्षण मिळाले.

शेवटी एवढेच सांगता येईल की आजची पुढारलेली महिला सर्व भान सांभाळून स्वतःला सिद्ध करण्यासाठी झटत आहे. इतर महिलांच्या मदतीने तसेच सहकार्याने यशाचे एक एक शिखर पादाक्रांत करीत आहे. स्वतःचे ध्येय साध्य करताना कधी पुरुषांची मदत लागली तर ती मदत स्वतःच्या सन्मानाला धक्का न लागता घेण्यात तिला काहीच कमीपणा वाटत नाही तसेच ती गोंधळतही नाही.

***


महिला दिनाच्या दिवशीच फक्त मला खुश करण्यासाठी हि असली मदत करण्यापेक्षा नेहमी मला माझ्या कामात मदत केलीत तर खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा केल्यासारखे होईल.
तुम्ही काय ऐकताय इथे थांबून. आम्ही स्त्री स्वातंत्र्य या विषयावर मला जे भाषण करायचे आहे त्याची तयारी करतोय. खबरदार जर बाहेर आलात तर. तुमची जागा स्वैपाकघरात आहे. जावा बरे आत !!
तरी मी तुला सांगत होतो. त्या मुलींची छेड काढू नकोस. त्या आता पहिल्या सारख्या अबला राहिल्या नाहीत. सबला झाल्या आहेत. समजलं का?
रणजित देवकुळे

# आधुनिक भारताच्या विकासात महिलांचे योगदान

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापर्यंत महिलावर्ग हा समाजातील दुर्लक्षित घटक होता. चूल आणि मूल ही दोनच क्षेत्र तिच्याकरिता उपलब्ध होती. रांधा, वाढा, उष्टी काढा व घराला वारस देणे यापुरतेच तिचे आयुष्य सीमित होते. तिची हौस-मौज तिच्या आवडी-निवडी याबद्दल तिला बोलण्याची परवानगी नसायची. स्त्रीसुलभ नटणे-मुरडणे ही केवळ अशक्य गोष्ट होती. पण विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या गोष्टी बदलण्याचे हळूहळू संकेत मिळू लागले. त्या काळातील रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले सारख्या कित्येक महिलांनी पतीच्या मदतीने समाजाला सर्वसमावेशक उन्नतीसाठी एक वेगळा विचार देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पुरुषवर्गाविरुद्ध बंडाचे निशाण दाखविण्याऐवजी पुरुषवर्गाच्या मदतीने महिलावर्गाची प्रगती / उन्नती करण्याचा मानस मनी बाळगला. त्याकाळच्या तथाकथित पठडीतून त्यांनी समाजाला बाहेर काढून उन्नतीचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला. मुलगी शिकली तर संपूर्ण घर शिकते ही उक्ती त्यांनी म हिलांना समजावून सांगितली. इंग्रजांच्या दबावाखाली भारतीय जनता कशी अस्तित्वहीन झाली आहे याची जाणीव करून देण्याचे काम रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले सारख्या कित्येक महिलांनी मनापासून केले. पण त्याचबरोबर शिक्षणामुळे विचार करण्याचा कक्षा रुंदावत असल्यामुळे शिकलेली मुलगी / महिला नुसत्या आपल्या घराचाच विचार न करता आपल्या समाजातील इतर घटकांचा विचारही करते. काही मुलींनी लहानपणापासून पोलीस दलात, नौदलात, हवाईदलात, भूदलात इत्यादी वेगवेगळ्या सेवा दलात आपली वर्णी लागावी म्हणून प्रयत्न करून त्या आपले स्वप्न अस्तित्वात आणतातच पण इतर मुलींसमोर आदर्शही ठेवतात. अशा मुलींकडून उत्तेजन घेऊन बाकीच्या मुली हे स्वप्न पहातात व ते अस्तित्वात आणण्यासाठी धडपडतात तसेच भारतीय अंतराळ संशोधन या संस्थेच्या चांद्रयान-२ तसेच मंगळयान या महत्वाकांक्षी प्रकल्पात महिला वैज्ञनिकांनी महत्त्वाचा वाटा उचलून भारतीय महिलांचे स्थान उंचावले आहे. मंगळ तसेच चंद्र या ग्रहावरील छायाचित्रे प्रसारित करून सकल विश्वातील मानव वर्गाची एकप्रकारची सेवा करून भारताचे नाव जगात दुमदुमत ठेवले आहे. यावरून एक लक्षात येते की संशोधन क्षेत्रातही महिला आघाडीवर राहून यशस्वी होत आहेत.

सामाजिक उन्नतीमध्ये महिलांचे योगदान आहे याचे उत्तर 'होय' असेच आहे. हा तिच्यात झालेला बदल हा सकारात्मक आहे का नकारात्मक ही गोष्ट सर्वस्वी तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून महिला स्वतःहून समाजाच्या प्रगतीसाठी / उन्नतीसाठी निःस्वार्थपणे काम करीत आहेत. राणी बंग, साधनाताई आमटे तसेच नुकत्याच निवर्तलेल्या सिंधुताई सपकाळ इत्यादी महिलांनी शहरातील विकासापासून कोसो दूर असलेल्या अतिदुर्बल / आदिवासी समाजाला त्यांनी विकसित करण्याचा चंग बांधला. या दुर्लक्षित घटकातील कित्येक जणांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले नैपुण्य सिद्ध करून संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वेधले. अर्थात या यशात त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या महिलांचा वाटादेखील तेव्हढाच महत्त्वाचा आहे. या महिलांनी समाज उन्नतीचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून त्याप्रमाणे मेहनत घेऊन काम करण्यास सुरूवात केली. या महिलांचे कौतुक अशासाठी वाटते की स्त्री सुलभ नटण्या-मुरडण्याला मुरड घालून आपले अवघे आयुष्य त्यांनी समाज उन्नती करिता वेचले. विवाहानंतर हौस-मौज करण्याच्या काळात त्यांनी वंचितांचे अश्रू पुसण्यात त्यांनी इतिकर्तव्यता मानली. महिला मुक्ती संघटना सारख्या संघटना आज महिलांच्यामागे सक्षमपणे उभ्या आहेत. महिलांच्या कोणत्याही प्रश्नांच्या / समस्यांच्या खोलात जाऊन त्याची उकल करण्याची ताकद महिलांनी स्वतःच्यात निर्माण केली आहे. ती समस्या कायदेशीर / कौटुंबिक / सामाजिक अथवा इतर कोणत्याही स्वरूपाची असो पण या महिला संघटना हिरीरीने त्या महिलेच्या मागे उभ्या राहतात. अनाथ व वंचित मुला-मुलींवर मायेचे छत्र धरणाऱ्या सिंधुताई सपकाळ सारख्या महिलांनी आईचे प्रेम ही दिले. त्यांनी या मुलांना आसरा मिळावा व त्यांचे संरक्षण ही व्हावे म्हणून लोकांच्या मदतीने त्यांनी त्या मुलांसाठी आश्रमाची निर्मिती केली. हे सर्व समाजकार्य करीत असतांना या सर्व महिलांनी शिक्षणाचे महत्त्वही ओळखले होते. ताराबाई मोडक, अनुताई वाघ इत्यादी महिलांनी शिक्षणाची पायाभरणी केली. शिक्षण किती महत्त्वाचे आहे याची जाणीव त्यांनी या मुलांना करून दिली व त्याचबरोबर त्यांच्यावर शिक्षणाचे संस्कार करून त्यांच्या मनात शिक्षणाबद्दल आस्था निर्माण करून शिक्षण घेण्यास भाग पाडले. शिक्षण घेतल्यावर साहजिकच ही मुले / मुली आपापल्या पायावर उभी राहू शकली. यातीलच काही मुले विविध आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताचे नाव दुमदुमत ठेवीत आहेत. राष्ट्रपती, राज्यपाल, पंतप्रधान, मुख्यमंत्री, लोकसभा अध्यक्ष, खासदार, आमदार पासून ते गावातील सरपंच अशा विविध पदांची आपल्या देशाच्या महिलांनी यशस्वीपणे धुरा सांभाळली आहे. आपला असा वेगळा ठसा उमटविला आहे. काही महिला आपल्या विद्वत्तेच्या / तल्लख बुद्धिमत्तेच्या जोरावर विविध राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय संस्थात मोठ्या पदावर / प्रमुखपदी विराजमान होऊन आपल्या भारत देशाची अस्मिता उंचावली आहे.

महिलांनी विधी व कायदा यासारख्या किचकट क्षेत्रातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. महिला विषयक वेगवेगळ्या प्रश्नांना व समस्यांना कायदेशीर मार्गाने लोकांसमोर आणून त्याची दखल शासनाने घ्यावी यासाठी अतोनात मेहनत घेतली. त्यामुळे फायदा

असा झाला की आपल्या मूलभूत व न्याय हक्कासाठी जागरूकपणे लढण्याचे बळ आजच्या महिलांच्या मनात संघटित झाल्यामुळे निर्माण झाले आहे. त्याचबरोबर महिलांचा  सर्वांगीण विकास व्हावा या भावनेनें एकत्र येऊन महिलांच्या कायदेशीर हक्कांसाठी सरकारकडे दाद मागितली व आपल्या संघशक्तीची ताकद दाखविली. त्याला अनुसरून सरकारने कायद्यात बदल तर केलाच व त्याचा परिणाम म्हणजे सरकारने महिलांसाठीच्या आरक्षणाचा कायदा विधी मंडळाकडून संमत करून घेतला. अगदी विसावे शतक संपेपर्यंत भारतासारख्या विशाल लोकशाहीत महिलांचा सहभाग अतिशय अल्प होता. पण नंतर महिलांचे  हक्क मिळावेत म्हणून त्यांनी शासनाशी कायदेशीर मार्गाने लढा सुरू केला. या लढ्याचा परिपाक म्हणून सरकारला महिलांसाठी कायद्यात बदल करावा लागला. त्याचबरोबर महिलांचे हक्क तसेच त्यांच्या न्याय संरक्षणासाठी कायदेही अस्तित्वात आणले. आजच्या घडीला लोकशाहीत महिलांसाठी विविध क्षेत्रात काही जागा मुद्दाम राखीव ठेवण्यात आल्या आहेत जेणेकरून त्या सर्व महिलांचे प्रश्न / समस्या हिरीरीने तसेच विस्तृतपणे मांडू शकतील. या कायद्यांमुळे समस्त महिला वर्गाला कायद्याचे सर्वंकष संरक्षण मिळाले. एव्हढेच नव्हे तर महिलांच्या प्रश्नांसाठी तसेच समस्यांकडे अगदी विस्तृतपणे पाहून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने वेगळ्या मंत्रालयाची स्थापना केली व ते म्हणजे 'महिला व बाल विकास मंत्रालय'.  या मंत्रालयासाठी एका केंद्रीय दर्जाचे मंत्रिपद पद निर्माण केले.  साधारणतः या मंत्रिपदावर महिलाच विराजमान असते. संसदेत चर्चिल्या जाणाऱ्या प्रत्येक महिलांविषयक प्रश्नांवर या मंत्रालयाशी प्रथम चर्चा केली जाते. एखादे





महिलांविषयक धोरण अथवा विधेयक संसदेत मांडायचे असेल तर या मंत्रालयाचा मंत्रीच ते काम करू शकतो / शकते. कामाच्या ठिकाणी महिलांना होणाऱ्या विविध प्रकारच्या त्रासाला / अत्याचाराला वाचा फोडून सरकारी यंत्रणेला या बाबतीत लक्ष घालण्यास प्रवृत्त केले. परराष्ट्रीय मंत्रालय / अर्थ मंत्रालय / संरक्षण मंत्रालय या सारख्या जोखमीच्या व संवेदनशील मंत्रालयातही महिलांनी आपला असा वेगळा ठसा उमटविला आहे.   तसेच आपल्या तिन्हीही संरक्षण दलात / सीमेवर दक्ष असणाऱ्या दलात महिलांची संख्या डोळ्यात भरणारी आहे. स्वातंत्र्यलढ्यातही महिलांनी आपला सहभाग अधोरेखित केला आहे. काही महिला स्वातंत्र्यलढ्यात आघाडीच्या फळीत होत्या तर काही महिला मागे राहून आघाडीवरील स्वातंत्र्यवीरांना लागेल ती मदत करीत होत्या.   या सर्व बाबतीत महिला असल्याची सबब पुढे न करता फक्त आणि फक्त आपल्या देशाचा विचार केला.


गेल्या काही वर्षांपासून दहीहंडीसारख्या पुरुषप्रधान साहसी सणांचा आनंद आता महिलाही घेऊ लागल्या आहेत. खूप ठिकाणी दहीहंडी महिला मंडळाची स्थापना झाली आहे तर काही दहीहंडी मंडळांनी महिलांना उत्तेजन देण्यासाठी महिला पथक स्थापन केले आहे.  विशेष म्हणजे या पथकात एकही पुरूष नसतो. कोणी महिला पडत असेल तर तिला सावरण्याचे काम महिलाच करतात.  त्यामुळे महिलांना या सणाचा आनंद तर उपभोगता येतो पण त्याच बरोबर इतर महिलांना पण या साहसी खेळाचे आकर्षण वाटू लागते.  त्यामुळे साहसी खेळाची नवीन पिढी आकार घेऊ लागते व त्यामुळे अशा तयार झालेल्या महिला साहसी / ताकदीच्या / चलाखीच्या विविध खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करू शकतात त्यामुळे गेल्या दोन दशकांपासून भारतीय महिला विविध खेळात भारताचे प्रतिनिधित्व तर करतातच व त्याचबरोबर यशस्वीही होतात. याचा परिपाक म्हणजे विविध प्रकारच्या खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुलींचे / महिलांचे प्रमाण लक्षणीय झाले आहे.  निरनिराळ्या एकल तसेच सांघिक राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय खेळात महिलांनी / मुलींनी आपली नाममुद्रा उमटविली असून विविध खेळात भारताची दखल घेण्यास भाग पाडले.  क्रिकेट, बॅडमिंटन इत्यादी सारख्या मैदानी खेळाप्रमाणेच बुद्धिबळ, ब्रिज इत्यादी सारख्या खेळातही मेहनतीने प्राविण्य मिळवून भारताचा दबदबा निर्माण केला आहे. मानवी रक्तदानासारख्या श्रेष्ठ दानात सुहासिनी मुळगावकर सारख्या महिलांनी पुढाकार घेऊन रक्तदानाचे महत्त्व समाजाला समजावून सांगतांना हे ही पटवून दिले की मानवी रक्त कोणत्याही कारखान्यात बनविता येत नाही. याचा फायदा असा झाला की जनता स्वयंस्फूर्तीने रक्तदानास पुढे येऊ लागली व त्याचा फायदा अव्याहतपणे भारताला होईल याबद्दल शंका नाही.

शेवटी असे सांगता येईल की जवळपास प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने आपला असा वेगळा ठसा उमटविला आहे. मेहनत आणि एकाग्रता याच्या जोरावर भारतीय महिलांनी जवळ जवळ प्रत्येक क्षेत्रात यशस्वी मुसंडी मारली आहे.

**टीम बिइंग वुमन**


आनंदाच्या रंगांनी आयुष्य
सजवणारी ती 'रंगकर्मी'
#सलाम स्त्री शक्तीला


आई या दोन शब्दात कधीही न समावणारी
ती 'मातृत्वदायिनी... जीवनदायिनी,
#सलाम स्त्री शक्तीला


अडथळ्यांची शर्यत पार करत स्वतःच अस्तित्व
घडविणारी ती 'यशस्वीता'
#सलाम स्त्री शक्तीला


अंकुराला आकार देणारी, जोपासणारी ,
घडवणारी ती अदभूत 'मूर्तिकार'
#सलाम स्त्री शक्तीला


नाविन्यपूर्ण गोष्टींचा सातत्याने
ध्यास घेणारी ती 'नवकलाकृती'
#सलाम स्त्री शक्तीला